# रत्नागिरीच्या राजकीय पटलावरील हरहुन्नरी नेता हरपला

उमेशजी शेट्ये यांच्या कारकीर्दीत रत्नागिरी शहराचा विकास ज्या वेगाने झाला त्याला तोड नाही. जिजामाता उद्यान, स्वा. सावरकर नाट्यगृह इ. ठिकाणं शहराची शान असून सर्वसामान्य जनतेच्या मनोरंजनाची प्रमुख साधनं आहेत. माझी त्यांची भेट झाली ती झाडगांव प्रभागातील मूलभूत गरजा तसेच झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात. १०-१५ वर्षांपासून रखडलेला त्या भागातील रस्ते, गटार, पाणी, लाईट, स्वच्छता याबाबतीतील कामं ज्या वेगाने पूर्ण झाली यातून त्यांची धडाडी आणि सामाजिक प्रश्नांची असलेली कळकळ दिसून येते. सर्वसामान्य जनता हे कधीच विसरणार नाही.

ज्यावेळी त्यांना माहिती मिळाली की माझ्या माहेरच्या कुटुंबाला राजकीय पार्श्वभूमी आहे. त्यांनी मला त्याची आठवण करून दिली आणि मी सुद्धा सक्रीय सहभाग घेऊन उभं रहावं अशी इच्छा व्यक्त केली, परंतु राजकारण हा माझा पिंड नाही असे म्हणून मी त्यांना नम्रपणे नकार दिला, परंतु माघार घेतील ते उमेश शेट्ये कसले? त्यांनी बऱ्याचवेळा मला पटवून देण्याचा प्रयत्न केला. तुमच्यासारख्या व्यक्ती राजकारणात आल्या पाहिजेत. परंतु मला ते काही जमलं नाही. अर्थात गेल्या वर्षापर्यंत जवळजवळ प्रत्येक पक्षाकडून मला ही ऑफर आली होती, परंतु माझं मत काही बदललं नाही. असो.

असं असलं तरीही त्यांनी माझ्या प्रत्येक सामाजिक कार्यात मला सहकार्य केलं. आमच्या स्वयंसेतू संस्थेचा उद्‌घाटन सोहळा, वार्ताफलकाचे अनावरण, स्वच्छता अभियान इ. कार्यक्रमांना ते जातीने हजर राहिले. झोपडपट्टीतील बचतगटांची स्थापना, पुनर्वसनाचे प्रस्ताव ही कामं रत्नागिरीत सर्वप्रथम झाडगां व येथे आमच्या संस्थेमार्फत झाली. यालाही त्यांचा सक्रीय पाठिंबा होता. २००३ साली जर वाल्मिकी आंबेडकर योजना बंद झाली नसती तर आजवर 'झोपडपट्टी पुनर्वसनाचं' भिजत पडलेलं घोंगडं केव्हाच मार्गी लागलं असतं.

सामाजिक कर्तृत्वाची उत्तम जाण असलेला, रत्नागिरी शहराची किंबहुना जिल्ह्याची नस न् नस माहीत असलेला अभ्यासू, दूरदर्शी, कामसू, सामाजिक कार्यकर्त्यांचा आदर करणारा आणि नाठाळांना वठणीवर आणणारा असा एक दिलदार कार्यसम्राट अकाली राजकीय पटलावरून हरपल्याने रत्नागिरीच्या विकास कामात फार मोठी पोकळी निर्माण झालीय हे कोणी नाकारू शकणार नाही. सध्याच्या राजकारण्यांनी यापासून काहीतरी बोध घ्यावा हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल!

**श्रद्धा कळंबटे,**
**रत्नागिरी**